Review Of Research
ISSN 2249-894X

Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 5 | Issue - 2 | Nov - 2015

# मराठी आख्यायिकांची संकल्पना

भास्कर निफाडे
पदव्युत्तर अध्ययन व संशोधन केंद्र, रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

**प्रस्तावना:**

आख्यायिका, आख्यान, इतिहास व पुराण हे शब्द आद्य वैय्याकरणींना परिचित होते. पाणिनीच्या वार्तिकावर भाष्य करतांना पतंजलीने आख्यान व आख्यायिका यातला भेद व्यक्त केला आहे. पण तो व्यक्त करताना त्याने या दोन प्रकारांची लक्षणे विशद न करता, केवळ उदाहरणेच दिलेली आहेत. दुर्गा भागवतांनी आपल्या ''लोकसाहित्यची रुपरेखा'' या पुस्तकात पतंजलीने दिलेल्या आख्यान व आख्यायिकांच्या उदाहरणांवरून त्यांच्यातील भेद असा स्पष्ट केला आहे की, ''आख्याने म्हणजे अति पुरातन व पूज्य कथा. आख्यायिका म्हणजे लौकिक कथा, विशेषतः ऐतिहासिक दंत कथा. या कथांत दिव्यांश नाही. त्या काल्पनिक असतात.''[०१]



''आख्यायिका हा शब्द प्रारंभीच्या वैदिक वाङ्मयात सापडत नाही. उत्तरकाळातल्या - तैत्तिरीय - आरण्यकात (१.६.३) एकदाच तो येतो. पण तिथे तो कुठल्या अर्थाने वापरलेला आहे हे नीट समजत नाही. महाभारतापासून मात्र हा शब्द कथा या अर्थी रुळलेला दिसतो.''[०२] ज्या गद्य प्रकाराला दंडी आख्यायिका म्हणतो, तिलाच विश्वनाथ कथा म्हणतात. अग्निपुराणाने गद्य काव्याचे पाच प्रकार वर्णन केले आहेत ते असे - आख्यायिका, कथा, खण्डकथा, परीकथा आणि कथानिका. यातील आख्यायिका म्हणजे जेथे कर्त्याची वंशाची प्रशंसा गद्याने विस्तारपूर्वक सांगितली जाते, कन्याहरण, संग्राम, विप्रलंभासारख्या विपली वर्णन केल्या जातात, उच्छवास व परिच्छेदांनी जिथे कथा विभागली जाते, वक्त्याच्या मुखाने किंवा अन्य मुखाने जिचे कथन होते, तिला आख्यायिका म्हणावे. अग्निपुराणात आख्यायिकेचे वाङ्मयीन उदाहरण दिलेले नाही, कथा आणि आख्यायिका यातला भेद दण्डीला मान्य नाही. अग्निपुराण व भामट यांनी भेद दाखवले आहेत. परंतु अमरकोशात यांच्या सर्वात सोप्या व्याख्या दिलेल्या आहेत. त्यात 'आख्यायिका उपलब्धार्थी' आणि 'प्रबन्ध कल्पना कथा' असे म्हटलेले आहे.

एकंदरीत आख्यायिकेत १) नायक आपल्या कृतींचे स्वतःच वर्णन करतो. २) आख्यायिका उच्छवासात विभागली जाते. ३) वक्त्र व अपवक्त्र छंदात ती असते. ४) विषय युद्ध, कन्याहरण इत्यादी असतात. ५) श्लेषात्मक शब्दांचा वापर विशेष करून असतो.

वैदेही कोळेकर यांनी 'मराठी लोककथा स्वरूप मीमांसा' या पुस्तकात मराठी लोककथांचे वर्गीकरण आणि त्यांचे ठळक विशेष स्पष्ट करतांना लोककथेच्या वर्गीकरणाच्या प्राचीन प्रयत्नात कथा आणि आख्यायिका संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. त्यांच्या मते ''लोककथांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न फार प्राचीन काळापासून भारतात झाला आहे. त्या काळी कथेचे दोन प्रमुख विभाग मानण्यात आले. एक विभाग कथा - जिला वास्तवाचा आधार नाही, जी कल्पनेतून निर्माण होते तिला कथा म्हणावयाचे. कथाचे या अवास्तव रुपाकडेच प्राचीन भारतीय साहित्य शास्त्रज्ञांनी अधिक निर्देश केलेला आढळतो. भरताने कथेचे रुप सांगताना 'बव्हनृता स्तोकसत्वा' (खूपशी खोटी व अगदी थोडी खरी) असे प्रतिपादन केले आहे. अमर, कोलाहलाचार्य यांनीही या मताला पुष्टी दिली आहे. दुसरा विभाग - आख्यायिका - 'आख्यायिका' या कथेच्या दुस-या विभागात कथेला सत्याचा आधार असतो. केवळ कल्पनाकथा असे तिचे स्वरूप नसून कुठली तरी सत्य घटना, व्यक्ती यांचा तिला आधार असतो.''[०३] दुर्गा भागवतांनी आख्यायिकांमध्ये दिव्यांश नसतो त्या काल्पनिक असतात असे म्हटले आहे तर वैदेही कोळेकरांनी मांडलेल्या विवेचनात आख्यायिकेत कुठली तरी सत्य घटना, व्यक्ती यांचा आधार असल्याचे मत मांडले आहे. प्रभाकर मांडे यांनी आपल्या 'लोक साहित्याचे स्वरुप' या पुस्तकात दंतकथा ही पारिभाषिक संज्ञा ऐतिहासिक आख्यायिकांसाठी वापरतात. असे म्हटले आहे. त्यांच्या मते ''एखाद्या ऐतिहासिक घटनेची स्मृती समाजमानसामध्ये दंतकथेच्या स्वरुपात टिकून राहते. ऐतिहासिक सत्य हे

कल्पनाव गुंठित स्वरुपात समाज मानसात दंतकथेच्या रुपात असते. दंतकथेमध्ये घडलेल्या घटनेचा सूक्ष्म का असेना परंतु धागा हा असतोच."[०४]

डॉ. शरद व्यवहारे यांनी 'लोकवाङ्मय रुप-स्वरुप' या पुस्तकात लोककथांचे वर्गीकरण करताना भारतातील लोककथांचे वर्गीकरण करताना प्राचीन अभ्यासक प्रामुख्याने एक कथेचा आणि दुसरा आख्यायिकेचा असे दोन वर्ग करीत असल्याचे म्हटले आहे. "प्राचीन अभ्यासकांच्या मतानुसार निर्मात्याला कल्पकतेतून साकार झालेली वास्तवाचा आणि सत्याचा आधार नसलेली गोष्ट म्हणजे कथा आणि सत्यावर आधारीत किंवा इतिहासात होऊन गेलेल्या व्यक्ती, घटना, प्रसंगावर आधारीत असलेली गोष्ट म्हणजे आख्यायिका."[०५] असे म्हटले आहे.

मराठी लोककथांचे वर्गीकरण करून कथेच्या स्वरुप विशेषांचा अभ्यास करणा-या श्रीमती दुर्गा भागवत, डॉ. सरोजिनी बाबर, डॉ. प्रभाकर मांडे, मालतीबाई दांडेकर, वैदेही कोळेकर, डॉ. शरद व्यवहारे या अभ्यासकांनी मराठी लोककथेचे अनेक पैलू प्रकाशात आणले आहेत त्यात आख्यायिकेचाही समावेश आहे. आख्यायिकेलाच 'दंतकथा' असे संबोधले आहे आणि त्या संदर्भातील विवेचन केले आहे.

दंतकथा ही पारिभाषिक संज्ञा ऐतिहासिक आख्यायिकांसाठी वापरतात. दंतकथा आख्यायिका हा शुद्ध संस्कृत, प्राकृत किंवा पाली वाङ्मयात आढळत नाही. दंतकथा, आख्यायिका हा लोककथांचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार असून प्रदेश विशिष्टतेच्या दृष्टीने त्यांना मोठे महत्त्व द्यावे लागते.

ऐतिहासिक घटनेवर आधारीत पण काल्पनिक स्वरूपाची मौखिक परंपरेने लोक जीवनात रुढ झालेली कथा म्हणजे दंतकथा किंवा आख्यायिका होय.

लोक जीवनात मौखिक परंपरेने चालत आलेली अशी कथा जिचा आधार एखादी ऐतिहासिक घटना असते. मात्र मौखिक परंपरेमध्ये जिचे स्वरुप पूर्णपणे बदललेले असते तिला दंतकथा म्हणतात.

आख्यायिका सत्य असते. तिच्यात सत्याचा अंश असतो पण शतकानुशतके त्या भोवती काल्पनिक आणि कल्पनातील गोष्टींची, समजूतींची वेष्टणे लोक जीवनानेच चढवलेली असतात. त्यामुळे जे काही अल्पस्वल्प सत्य त्यात शिल्लक राहते. त्याची उकल करणे कठीण होऊन जाते. दंतकथेतील इतिहास, ऐतिहासिक सत्य त्यामुळे धुसर, अस्पष्ट बनते. दंतकथांना ऐतिहासिक आख्यायिका असे म्हटले जाते. सत्य व्यक्तींना दंतकथेत अलौकिकत्व आणि अमानुषत्व देऊन टाकलेले असते. समाज आपल्या आठवणीतील श्रेष्ठ आणि लोकोत्तर पुरूषांना दंतकथा निर्माण करून देव करून टाकतो. इतिहासातील व्यक्ती त्यांच्या जीवनातील घटना, महत्त्वपूर्ण स्थल, वास्तू इत्यादीबद्दल मौखिक परंपरेने लोक जीवनात या आख्यायिका प्रचलित दिसतात. म्हणूनच दंतकथा या ऐतिहासिक आख्यायिका असतात असे म्हटले जाते. त्यांचा गाभा सत्यसृष्टीतील असतो. काही दंतकथांना पौराणिक कथेचे किंवा दैवतकथेचे स्वरुप प्राप्त झालेले असले तरी त्यांच्या मुळाशी केव्हाचे तरी ऐतिहासिक सत्य दडलेले असते असे दिसते.

मराठी आख्यायिकांतील वर्ण्य विषयाचे क्षेत्र अत्यंत विस्तृत आहे. पुराणकाळापासून ते अर्वाचीन काळापर्यंतचा प्रदीर्घकाळ त्यात सामावलेला आहे. त्या काळातील अनेक व्यक्तींची, घटनांची क्वचित काही प्राणी व वनस्पतींचीही स्मृती लोकमानसाने कथांच्या रुपाने कायम ठेवली आहे. प्रत्येक देशात आख्यायिका वैपुल्याने ऐकावयास मिळतात. वीर, पराक्र मी पुरूषांच्या, सद्गुणी आणि अलौकिक सामर्थ्य असलेल्या व्यक्तींच्या आख्यायिकांच्या स्वरुपातील कथा विपूल संख्येने दिसतात. लोकमानसावर अशा व्यक्तींचा प्रभाव पडून लोक त्यांची स्तुती गीते गातात. प्रत्येक पिढी आपल्या कल्पनेनुसार त्यात भर घालून पुढच्या पिढीच्या स्वाधीन करत असते. वीर कथांप्रमाणेच स्थल माहात्म्य सांगणा-या कथाही लोकजीवनात रुढ असतात. एखाद्या गावाचे किंवा स्थळाचे नाव का पडले ही मूर्ती येथे कशी आली, हे मंदीर किंवा वास्तू कोणी बांधली इ. संबंधीच्या आख्यायिका प्रचलित असतात. पवित्र स्थळ, नदी, पर्वत, डोंगर, जुने नगर, जुनी वास्तू यांच्या भोवती कथेची वीण झालेली असते. औंढ्यानागनाथाचे मंदीर, कयाधू नदी, म्हसोबा डोंगर, पैठण नगरी, पंचवटी इत्यादी महाराष्ट्रातील स्थलांचा निर्देश या संदर्भात करता येतो.

आख्यायिकांतील व्यक्ती घटना, प्रसंग आणि उल्लेख लक्षात घेता या दंतकथांचे पुढीलप्रमाणे वर्ग पाडता येतात.

१) ऐतिहासिक किंवा इतिहासातील थोर व्यक्ती (राजा, सद्गुणी, गुणसंपन्न व्यक्ती) किंवा घटना यांच्याविषयीच्या कथा.
२) संत महंतांच्या कथा.
३) स्थलासंबंधीच्या कथा (पवित्र स्थाने, प्राचीन नगर, प्राचीन वसाहती इ. स्थलविषयी)
४) भूमिगत (पुरलेल्या) धना संबंधीच्या कथा.
५) वास्तू, वस्तू, झाडे, विशिष्ट घराणी, नदी, पर्वत, डोंगर यांच्या विषयीची कथा.
६) पुराणातील देव-देवता संबंध दर्शक कथा तसेच भूता-खेतासंबंधीच्या कथा.

आख्यायिकेतील दंत कथेतील ब-याचशा कथा त्या-त्या परिसरात प्रचलित असतात. त्यांच्या दृश्य खुणा, ओसाड वास्तू, जुना वृक्ष, समाधी, देऊळ इत्यादी अवशेषांच्या रुपाने या कथा लोकजीवनात सांगितल्या जातात. अशा आख्यायिकांना स्थानिक दंतकथा म्हणतात. ही कथा पूर्णपणे स्थावर असते. पण जेव्हा अशा कथेतील कथाबीज विखुरले जाते व त्या आधाराने एखादी कथा प्रचलित होते

तेव्हा तिला भटक्या दंतकथेचे स्वरुप येते. त्यामुळे तिचे क्षेत्र विस्तारीत होते. स्थानिक दंतकथेत माहात्म्यकथांचा समावेश असतो. निरनिराळी तीर्थक्षेत्रे, नदी, डोंगर, देवस्थाने इत्यादी संबंधीच्या कथा पुराणांतही आहेत. त्यांचे स्वरुप आख्यायिकांचेच आहे. महाराष्ट्रातील संतांची चरित्रे दंतकथा आणि आख्यायिका यांनी शिगोशीग भरलेली आहेत. महिपतीच्या भक्तविजय, भक्तलीलामृत या ग्रंथांमध्ये महाराष्ट्रात होऊन गेलेल्या संतांची चरित्रे दिली आहेत. प्रामुख्याने दंतकथा आणि आख्यायिकांच्याच आधारे त्यांनी हे लेखन केले आहे. आख्यायिकेचा निश्चित असा आकार ठरलेला नसतो. ठरीव असे रचनातंत्रही नसते. आशय मात्र ठरलेला असतो. आशयपरत्वे स्वरुप बदलत जाते. प्रारंभ आणि शेवट याविषयीही काही संकेत नसतात. ती आकस्मिकपणे सुरू होते आणि अकस्मात थांबते.

आख्यायिकेचे एकूण स्वरूप पाहू जाता पुराणकथा आणि अद्भूतकथा यांच्याशी दंतकथा जवळीक साधतांना दिसतात. असे असले तरीह त्यांच्या मुळाशी केव्हाचे तरी ऐतिहासिक सत्य दडलेले असते हे लक्षात घ्यावे लागते. दंतकथा ऐतिहासिक आख्यायिका असून त्यांचा गाभा सत्यसृष्टीतील असतो. कोणत्याही देशाच्या व प्रांताच्या लोककथांचा अभ्यास करीत असताना त्या-त्या देशाच्या वा प्रांताच्या प्रदेश विशिष्टतेचा शोध घेताना अन्य लोककथा प्रकारांपेक्षा दंतकथांची अधिक मदत होऊ शकते. सत्याधार हा दंतकथांचा, आख्यायिकांचा सर्वात महत्त्वाचा विशेष असतो. 'लोकस्मृतीचे वाहक' म्हणून संबोधल्या जाणा-या आख्यायिका (दंतकथा) एखाद्या विशिष्ट प्रदेशातील असामान्य माणसे, घटना यांच्याबद्दलची स्मृती कथांद्वारे परंपरेने जतन करतात. ही स्मृती बरेच वेळा कल्पनावगुंठित असली तरी तिला सत्याधार हा निश्चितपणे असतोच. त्यामुळे स्थानिक दंतकथांतून एखाद्या विशिष्ट प्रदेशातील गावांचे, व्यक्तींचे, स्थानिक रुढींचे विशेष समजू शकतात. मराठी दंतकथांतूनही महाराष्ट्राबाबतची अशी माहिती मिळू शकते. किंबहुना मराठी दंतकथांतूनच महाराष्ट्रातील एकूण धार्मिक, सामाजिक वातावरणाचे सम्यक दर्शन घडते असे म्हणता येते. आख्यायिका अद्भूत कथेसारखी रंजनासाठी निर्माण होत नाही. तसेच बोधकथेप्रमाणे उपदेश करण्यासाठी निर्माण होत नाही. परंपरेने कल्पना व गुंठीत स्वरुपात चालत आलेली लोकस्मृती असे दंतकथेचे थोडक्यात वर्णन करता येईल.

**संदर्भ :-**


१) भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रुपरेखा - वरदा बुक्स, पुणे, दुसरी आवृत्ती, १९७७, पृ. ९२.

२) भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रुपरेखा - वरदा बुक्स, पुणे, दुसरी आवृत्ती, १९७७, पृ. ७५.

३) कोळेकर वैदेही, मराठी लोककथा स्वरुप मीमांसा, सविता प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९८७, पृ. १६, १७.

४) मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरुप, सविता प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती, १९८९, पृ. २१२.

५) डॉ. व्यवहारे शरद, लोकवाङ्मय, रुप-स्वरुप, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९१, पृ. ११३.